आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतली
माजी मंत्री शिंगणे यांची भेट >>पान 2

आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतली
ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांची भेट >>पान 3

तालुक्यातील पहिले आदर्श आपले
सरकार सेवा केंद्राचा डोणगावला मान >>पान 4

**सुविचार**
ज्याच्या जीवनामध्ये निश्चित ध्येय नसते त्यालाच वेळ घालविण्यासाठी साधन शोधण्याची गरज भासते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com  मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034





अभिनेत्री अमृता देशमुख 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये झळकणार

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई  आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 115 ■ गुरूवार, दि. 05 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राज्यात पुन्हा देवेंद्र!



**मुंबई/प्रतिनिधी :महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार, हे स्पष्ट झाले आहे. देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांची एकमताने भाजपच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली. गुरुवार, दि. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता आझाद मैदानावर ते मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत शपथविधी सोहळा पार पडणार आहे.**

भाजपच्या विधिमंडळ नेत्याच्या निवडीसाठी बुधवारी सकाळी विधानभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये भाजप आमदारांची बैठक पार पडली. भाजपचे नेते चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव बैठकीत मांडला. भाजप नेत्या पंकजा मुंडे, प्रविण दरेकर, रवींद्र चव्हाण, संजय कुटे, संजय सावकारे यांच्यासह वरीष्ठ नेत्यांनी या ठरावाला अनुमोदन दिले. त्याआधी भाजपच्या कोअर कमिटीची बैठक विधिमंडळ पक्ष कार्यालयात झाली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी या निरिक्षकांसह भाजपच्या कोअर कमिटीचे सदस्य बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांचे नाव गटनेतेपदासाठी अंतिम करण्यात आले.




## सत्तेत कुणीही बसू दे मी आक्षणासाठी भांडणार; मनोज जरांगे पाटील

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** सत्तेत कुणीही बसू दे मी आरक्षणासाठी भांडत राहणार आणि गोरगरीब मराठ्याच्या जीवन मरणाचा आरक्षणाचा असलेला प्रश्न मार्गी लावणार आहे, अशी प्रतिक्रिया मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, सत्ता आली म्हणून मस्तीत यायचे नाही,मराठ्यांशी बेईमानी करायची नाही,नादाला लागायचं नाही, मराठ्यांच्या मताशिवाय सत्तेत कुणी येवू शकत नाही,एकदा मराठा रस्त्यावर उतरला ना मग कुणाच्या बापाला घाबरत नाही. सत्तेत कुणीही बसू मी त्याला सोडणार नाही,सत्तेतल्याच माणसाला भांडावे लागत असते, ते सत्तेत नसते तर मग विरोध करण्याचे कारणच नाही,आक्षणासाठी मी भांडणार आणि सोडणार सुद्धा नाही,असा इशाराही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला. तसेच सरकार स्थापन झाल्यावर सामूहिक आमरण उपोषणाची तारीख जाहीर करू, आझाद मैदानावर उपोषण समाजाला विचारून करू,ओबीसींना मी कधी शत्रू मानलेले नाही, पण नेत्यांना सोडणार नाही कारण नेते कोणाचेच नसतात.आम्हाला विरोध करणारे दोन तीनच नेते आहेत,समाजाचा विरोध नाही,लाडक्या बहिण योजनेत सरकारने जाचक अटी आणल्या. आज आपली लेकरे मोठी व्हावीत म्हणून मराठा समाज ताकदीने संघर्ष करत आहे. मराठ्यांच्या लकरांसाठी आवश्यक असलेले आरक्षण मिळवून देण्यासाठी मी सतत पाठपुरावा करून आरक्षणाचा प्रश्न मराठ्यांच्या सोबतीने मार्गी लावणार आहे, असे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



## महायुतीचे तिन्ही नेते राजभवनावर, राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाली आहे. भाजपच्या गटनेते पदाची निवड झाल्यानंतर आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भाजप विधिमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्यानं तेच मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार हे निश्रि्चत झाले आहे. तर महायुतीमधील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची आज एक महत्त्वाची बैठक वर्षा निवासस्थानीवर



पार पडली.

या बैठकीनंतर आता राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा करण्यासाठी महायुतीचे हे तिन्ही नेते राजभवनावर दाखल झाले आहेत. दरम्यान, संख्याबळासाठी आमदारांच्या स्वाक्षरीचं पत्र राज्यापालांना देण्यात आलं आहे. देवेंद्र फडणीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे या महायुतीमधील प्रमुख नेत्यांनी राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केला आहे.

दरम्यान, आज संध्याकाळी साडे पाच वाजता मुंबईतील आझाद मैदानावर नव्या सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार आहेत. महायुतीच्या नव्या सरकारामध्ये एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असा जुनाच पॅटर्न कायम राहणार आहेत. उद्या देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्यासोबत दोन उपमुख्यमंत्री देखील शपथ घेणार आहेत.

## ठाण्यात सापडलेल्या गावठी बॉम्बचे माणगाव-सातारा कनेक्शन!

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे शहरात गावठी हात बॉम्बचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी रायगड येथील माणगाव भागातील एका तरूणाला ताब्यात घेतले असून पोलिसांनी त्याच्याकडून १० हात बॉम्ब जप्त केले आहेत. त्याच्या इतर साथिदारांचा पोलीस शोध घेत आहेत. हे गावठी हात बॉम्ब रान डुकरांच्या शिकारीसाठी वापरले जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. साकेत रोड परिसरात एकजण गावठी हात बॉम्ब घेऊन येत असल्याची माहिती ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, गुन्हे अन्वेषण शाखेच्या मध्यवर्ती शोध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांच्या पथकाने सापळा रचला.

## एकनाथ शिंदेंची काल भेट घेऊन त्यांना सरकारमध्ये राहण्याची विनंती केली, त्यांनीही सकारात्मकता दाखवली : फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :मी काल स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी गेलो होतो. तुम्ही स्वत: या सरकारमध्ये आमच्यासोबत राहायला हवं, असं निवदेन मी एकनाथरावांना केलं होतं. एकनाथ शिंदेंनी सरकारमध्ये राहावं, अशी शिवसेनेच्या आमदारांची देखील इच्छा आहे. महायुतीच्या आमदारांची देखील हीच इच्छा आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, ते आमच्या सरकारमध्ये असतील, असं राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्यपालांकडे सत्ता स्थापनेचा दावा केल्यानंतर महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील अडिच वर्षात एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मी असं तिघांनी एकत्रितपणे निर्णय घेतले आहेत. आज देखील आम्हाला हे पद तांत्रिक बाब आहे. इतर आमच्या मित्र पक्षांना विश्र्वासात घेऊन निर्णय घेतला जाईल. महाराष्ट्रातील लोकांना दिलेले आश्र्वासन पूर्ण करण्यासाठी प्राणपणाने हे सरकार काम करेलं.

मी एकनाथ शिंदे यांचं आभार मानतो. त्यांनी मला मुख्यमंत्री म्हणून शपथ द्यावी, असं पत्र दिलेलं आहे. अजित पवार आणि इतर पक्षांनीही पत्र दिलेलं आहे. मी सर्वांचं आभार मानतो. रामदास आठवले यांचेही मी आभार मानतो.


## राहुल नार्वेकर पुन्हा विधानसभा अध्यक्ष होणार, सूत्रांची माहिती



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून भाजप नेते देवेंद्र फडणवीस उद्या शपथ घेणार आहेत. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत. आज सकाळी भाजपच्या आमदारांची बैठक झाली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची भाजपचे विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली. यानंतर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे तीन नेते राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या भेटीला गेले आहेत. या घडामोडी सुरु असतानाच महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्ष कोण असणार याबाबतची माहिती समोर आली आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई शहरात 'ड्राय डे' जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने ६ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई शहर जिल्ह्यातील ठोक व किरकोळ देशी, विदेशी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्यात येणार आहेत. राज्य उत्पादन शुल्कच्या एफ विभागाचे निरीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अबकारी अनुज्ञप्त्या ५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपासून ते दि. ६ डिसेंबर रोजी संपूर्ण दिवस बंद राहणार आहेत, असे आदेश मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांनी दिले आहे. आदेशाची अंमलबजावणी न केल्यास अनुज्ञप्तीधारकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या आदेशानुसार, राज्य उत्पादन शुल्कचे डी विभाग निरीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील एन.एम जोशी मार्ग व वरळी पोलीस स्टेशन अंतर्गत येणारी सर्व अबकारी अनुज्ञप्त्या, ई विभाग निरीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील भोईवाडा व माटुंगा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व अबकारी अनुज्ञप्त्या ६ डिसेंबर २०२४ रोजी संपूर्ण दिवसभर बंद राहतील. संबंधित सर्व अबकारी अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची नोंद घ्यावी. जे अनुज्ञप्तीधारक या आदेशाची अंमलबजावणी करण्यात कुचराई करतील त्यांच्याविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ५४ व ५६ नुसार कडक कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी श्री. यादव यांच्या आदेशात नमूद आहे.



## सर्व ईव्हीएम मॅनेज झाले आहेत; जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** :लोकशाहीमध्ये मतदानाच्या प्रक्रियेमध्ये ०.०.१ जरी असेल तरी तुम्हाला मतदानाची प्रक्रिया बदलावी लागेल, जगातली लोकशाही टिकवण्यासाठी प्रक्रिया पारदर्शक असणे गरजेचे आहे.सर्व ईव्हीएम मॅनेज झाले आहेत, असा आरोप राष्ट्रवादी शरद पवार विधीमंडळ गटनेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना केला. यावेळी बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, या प्रक्रियेबद्दलच लोकांच्या मनात शंका आहे,पारदर्शकता ठेवा मतदान बरोबर झाले आहे. तर वरती सह्या केलेल्या चिठ्ठ्या आहेत, त्या मोजाव्यात. निवडणूक आयोगाने तोंड तरी उघडायला हवे १३ टक्के मते वाढले तरी कशी ? असा प्रश्र्न केला. १३ टक्के



म्हणजे एकंदर मतदानाच्या एक चतुर्थांश मत एका तासात वाढतात, मतांची बेरीज जुळतच नाही आहे. प्रक्रियेमध्ये काही जुळत असेल त्याचे उत्तर द्यावे, निवडणूक आयोगाने बाहेर यावे आणि उत्तर द्यावे असा प्रश्र्नही यावेळी त्यांनी केला.

तीन मतं दाबल्यानंतर सात मते पडली असे येणार असेल तर कुठेतरी काहीतरी घोटाळा आहे. ईव्हीएम हे सर्व मॅनेज झालेले दिसत आहे सर्व ठिकाणी पोस्टलमध्ये महाविकास आघाडी आघाडीवर आहे. राष्ट्रपती राजवट लागू होते मग महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू का होत नाही म्हणजे तुम्ही संविधानाला पायदळी तुडवाचे ठरवले आहे. भारताच्या इतिहासात अनेक सरकार बरखास्त झाली आजपर्यंत कुठेही केअर टेकिंग चीफ मिनिस्टर नावाचा शब्द आलेला नाही. काळजीवाहू नावाचा चीफ मिनिस्टर नसतो, असेंबली डीजोल झाली आहे. २६ तारखेला त्यांची मुदत संपली आहे. २६ नोव्हेंबरला रात्री १२ वाजता राष्ट्रपती राजवट लागू करायला हवी होती. आज किती दिवस झाले ही चूक मुख्यमंत्र्यांची नाही ही चूक राष्ट्रपती आणि गव्हर्नर यांची आहे. तुम्ही महाराष्ट्राच्या लोकांना मूर्ख बनवत आहात.

मारकडवाडीमध्ये तिथल्या लोकांनी लोकशाही पद्धतीने आमचे गाव कुणाला मतदान करतेय बॅलेट बॉक्समध्ये मतदान करायचे ठरवले त्याच्यात कुणाला अडचण आहे. का त्याने काय दंगा होणार होता का सगळे गाव शांतपणाने करणार होते सरकारने आणि निवडणूक आयोगाला एवढी भीती का वाटली ? असा प्रश्र्नही यावेळी आव्हाड यांनी केला. एक एप्रिलपासून इलेक्ट्रिसिटी बिलांमध्ये प्रचंड वाढ होणार आहे. सरकार आले आहे पाच वर्षानंतर बघू असे मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले. लाडक्या बहिणीचे नवीन कायदे करून लाडक्या बहिणी कशा कमी होतील याची तसबीज करण्यात येत आहे.

निवडणूक झाली आता काय करायचे,आम्ही लाडक्या बहिणीचा एकही पैसा कमी करून देणार नाही. वेळ आली तर महाराष्ट्र बंद करू पण एकही रुपया आम्ही आमच्या खिशातला तुम्हाला काढू देणार नाही, त्याच अटी शर्तीवर तुम्हाला कायम पैसे द्यावे लागतील हा विचार आधी का केला नाही, बहिणींची मते घेऊन झाल्यानंतर विचार करताय का ? असा प्रश्र्न केला. शपथ विधी होत असला तरी,मला अजून आमंत्रण आलेले नाही, आमंत्रण आल्यावर विचार करू अजून काही झालेले नाही, फडणवीसांना मुख्यमंत्री झाल्यावर भेटून शुभेच्छा देईन,मुख्यमंत्री झाल्यावर मी स्वतः पुष्पगुच्छ घेऊन जाईन लपून-छपून जाणार नाही.असे मतही यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गट विधीमंडळ गटनेते आ. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केले.

# आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतली माजी मंत्री शिंगणे यांची भेट

## पैनगंगा सहकारी सूतगिरणी पूर्ववत सुरू करण्यासाठी करणार प्रयत्न

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** :माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांचे ड्रीम प्रोजेक्ट म्हणजे पैनगंगा सहकारी सूतगिरणी,साखरखेर्डा व जिजामाता सहकारी साखर कारखाना दुसरबिड यापैकी दोन्ही प्रोजेक्ट सिंदखेड राजा मतदार संघातील तरुण युवकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देणारे आहेत परंतु गेल्या काही वर्षापासून साखर कारखाना व सूतगिरणी बंद असल्याने अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुण रोजगारा पासून वंचित आहेत त्यांच्या हाताला काम मिळावे म्हणून आज मेहकर मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांनी



दि.४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता शासकिय विश्राम गृह बुलढाणा येथे माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांची भेट घेऊन आशिर्वाद घेतले.

विविध विषयावर चर्चा केली असता माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी आमदार सिद्धार्थ खरात यांना पैनगंगा सहकारी सूतगिरणी पूर्ववत करण्यासाठी मदत करावी असे सुचवले तेव्हा आमदार खरात यांनी लगेच म्हटले हा प्रोजेक्ट आपण लवकर सुरू करू आपण म्हणाल ते मी सहकार्य करायला तयार असल्याची ग्वाही खरात यांनी यावेळी दिली.

तसेच या परिसरातील तरुण युवकांच्या हाताला काम देण्यासाठी प्रयत्न करणार अशी चर्चा यावेळी झाली. डॉ राजेंद्र शिंगणे हे जेंव्हा कॅबिनेट मंत्री होते तेंव्हा आ.सिद्धार्थ खरात हे त्यांचे स्विय सहाय्यक (खाजगी सचिव) त्यांनी जवळ पास ७ वर्ष काम केले त्यांचे एकमेकांशी अत्यंत घरोब्याचे सबंध आहेत आणि माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे हे प्रदिर्घ राजकीय अनुभवी आणि मुरब्बी राजकारणी आहेत याचा खरात यांना मतदार संघाच्या विकासासाठी नक्कीच फायदा होईल.आमदार सिद्धार्थ खरात यांनी माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांची भेट पुढील काळात विकासाचे राजकारण आणि मतदार संघात सलोख्याचे वातावरण निर्माण होईल यात तिळमात्र शंका नाही.

## फास्टफुड आरोग्यास घातक

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त 'मॉब स्ट्रीट प्ले'च्या माध्यमातून जनजागृती



दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : दिव्यांगाप्रती जनजागृती व्हावी, या उद्देशाने लातूर शहरातील विविध चौक व गर्दीच्या ठिकाणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली उमंग इन्स्टिटयूटच्या पथकाने फ्लॅश मॉब स्ट्रीट प्लेच्या माध्यमातून जनजागृती केली.

दिव्यांगत्व, प्रतिबंध, लवकर ओळख आणि लवकर हस्तक्षेप याबद्दल जागरूकता निर्माण करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. जिल्हा क्रीडा संकुल, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, मध्यवर्ती बस स्थानक, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, महात्मा गांधी चौक, गंजगोलाई, विवेकानंद चौक, एमआयटी कॉलेजसह अनेक ठिकाणी आयोजित पथनाट्याच्या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती. उत्साही आणि माहिती पूर्ण कामगिरी पाहण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने जमले होते.

कार्यक्रमाचा अविभाज्य भाग असलेल्या 'फ्लॅश मॉब पोस्टर प्रेझेंटेशनने' दिव्यांगत्व रोखण्यासाठी लवकर ओळख आणि हस्तक्षेपाचे महत्त्व प्रभावीपणे सांगितले. पोस्टर्समध्ये दिव्यांग बांधवांसाठी सर्व समावेशकता, सुलभता आणि समान संधींची गरज अधोरेखीत करण्यात आली. फ्लॅश मॉब स्ट्रीट प्ले, पोस्टर प्रेझेंटेशन आणि इतर उपक्रमांचा समावेश असलेल्या जनजागृती कार्यक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषद व उमंग सेंटरच्या माध्यमातून हा उपक्रम घेण्यात आला.

जनजागृती कार्यक्रमास उमंगचे सचिव किरण उटगे, डॉ. श्रीशैलम तलारी, डॉ. वैभव उटगे, डॉ. प्रतिक केंद्रे, डॉ.आंचल बांते, डॉ.अर्जुन राठोड, गणेश डोंगरे, किरण कांबळे, डॉ. शिवानी पाटील, डॉ.प्रविण राठोड, डॉ.भक्ती गोजमगुंडे, डॉ.तेजस्विनी लकडे, डॉ. सनोबर तांबोळी, अर्पणा बेंबळगे, उमंगचे व्यवस्थापक श्रीहरी गोरे, रामेश्र्वर जाधव आणि उमंग टीम यांनी उपस्थिती लावली.

## सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन प्रशिक्षण कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मत्स्यव्यवसायाचा विकास आणि विस्तार होण्याच्या दृष्टीकोनातून, मत्स्यव्यवसायातील इच्छुक प्रशिक्षणार्थींना सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन हे सहा महिन्याचे प्रशिक्षण १ जानेवारी २०२५ ते ३० जून २०२५ या कालावधीत देण्यात येणार आहे. या १३३ व्या सत्राचे प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र वर्सोवा, मुंबई उपनगर येथे आयोजित करण्यात आले असल्याचे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, वर्सोवा यांनी कळविले आहे. इच्छुकांनी २४ डिसेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्रातून मत्स्यव्यवसाय, नौकानयनाची मूलतत्वे, सागरी डिझेल इंजिनाच्या निरनिराळ्या भागाची माहिती व दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने, प्रात्याक्षिक इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणासाठी दारिद्र्य रेषेवरील प्रशिक्षणार्थीकडून प्रतिमहिना रूपये ४५०/-, दारिद्र्य रेषेखालील प्रशिक्षणार्थीकडून रूपये १००/- शुल्क आकारले जाते. या प्रशिक्षणासाठी पात्र प्रशिक्षणार्थी निकष खालीलप्रमाणे आहेत.

१) प्रशिक्षणार्थी क्रियाशील मच्छिमार व प्रकृतीने सुदृढ असणे आवश्यक आहे. २) प्रशिक्षणार्थी १८ ते ३५ वयोगटातील असावा. ३) प्रशिक्षणार्थीस पोहता येणे आवश्यक आहे. ४) ) प्रशिक्षणार्थी किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ५) प्रशिक्षणार्थीस मासेमारीचा किमान २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. ६) प्रशिक्षणार्थी बायोमेट्रिक कार्डधारक / आधारकार्डधारक असावा. ७) प्रशिक्षणार्थीचा विहित नमुन्यात परिपूर्ण अर्ज असावा व त्या अर्जावर संबंधीत मच्छिमार संस्थेची शिफारस असणे आवश्यक असून ८) प्रशिक्षणार्थी दारिद्र्यरेषेखालील असल्यास, अर्जासोबत त्याबाबतचे प्रमाणपत्र, संबंधीत गट विकास अधिकारी यांच्या दाखल्यांची स्वाक्षांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

# नालंदा विद्यापीठाचा इतिहास रंगमंचावर उलगडला ; 'वसुधैव कुटुंबकम'ने नाट्य रसिकांना विचारमग्न केले

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : ६३ व्या महाराष्ट्र राज्य मराठी नाट्य महोत्सवांतर्गत मंगळवारी (ता.३) नांदेड केंद्रात सादर झालेल्या तन्मय ग्रुपच्या वसुधैव कुटुंबकम या नाटकाने प्रेक्षकांना स्तब्ध केले. या नाटकाने नालंदा महाविहाराच्या दुर्दैवी इतिहासाला उजाळा देत, भारतीय शिक्षण परंपरेच्या महत्त्वावर विचारमंथन घडवले. दिग्दर्शक नाथा चितळे यांनी त्यांच्या सर्जनशील दिग्दर्शनातून हा विषय प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवला.

या नाटकाचे कथानक प्राचीन नालंदा विश्र्वविद्यालयाच्या स्थापनेपासून ते बख्तियार खिलजीच्या आक्रमणात झालेल्या विनाशापर्यंतचा प्रवास उलगडते. एकेकाळी ज्ञानाचा महासागर असलेल्या या विद्यापीठात विविध धर्म, शास्त्र आणि कलांचा अभ्यास विनामूल्य शिकवला जात होता. पण खिलजीच्या आक्रमणाने संपूर्ण ज्ञानसंपदा जाळून टाकली. नाटकात मैत्रीयी देवी, श्रमण स्त्री आणि इतर पात्रे नियतीचे प्रतीक म्हणून सादर केली आहेत. त्या विनाशक प्रारब्धाला बदलण्यासाठी धडपड करतात, मात्र शेवटी नियतीचा विजय होतो. नाटकाच्या निमित्ताने समाजात ज्ञानाची पुनर्स्थापना आणि जागृती होण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे. आजच्या शिक्षण क्षेत्रातील विकृती आणि व्यवसायीकरणाच्या पार्श्र्वभूमीवर प्रेक्षकांना आत्मपरीक्षण करायला लावणारा हा प्रयोग ठरला. हे विश्र्वची माझे घर ही वसुधैव कुटुंबकमची शिकवण प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात नाटक यशस्वी ठरले.हे नाटक केवळ ऐतिहासिक घटना मांडून थांबत नाही, तर प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडते की आपण आपल्या प्राचीन ज्ञानपरंपरेचा वारसा जपण्यासाठी काय करतो आहोत. या प्रयोगातून प्रेक्षकांना एक महत्त्वाचा संदेश दिला गेला, की शिक्षण आणि ज्ञानाचा वारसा जिवंत ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.



'वसुधैव कुटुंबकम'मध्ये विविध पात्रांनी प्रेक्षकांना प्रभावित केले. शुभांगी वाणी (नालंदा नगरी/मैत्रीयी देवी), नागेश लोकडे (बावळट बाळ), प्रीतम विलास भद्रे (आचार्य राहुल श्रीभट्ट), आदित्य उदावंत (बख्तियार खिलजी), कु. पूजा सुपेकर (नझिरा बेगम), प्राणहिता तलवारे (मझली बेगम), कु. दिव्या शेळके (छोटी बेगम), सौ. नीलिमा चितळे (बाळाची आजी), रोहन कदम (धम्मपाल), नितीश देशपांडे (वर्धनानंद), प्रणव चौसाळकर (आचार्य आर्यभट्ट), सुनील कौठेकर (आचार्य नागार्जुन), सुमित नाईक (आचार्य वसुबंध), गाणारा भिकू (राहुल), युनानी हकीम (नाथा चितळे), आणि पाठशाळेतील मुले (नेहा हापगुंडे, मानसी चौधरी, सानवी चौधरी, संजिवनी शिदे, प्रणव दिग्रसकर, आधिराज जालनेकर, भावेश तिलके) यांनी आपापल्या भूमिका उत्तम प्रकारे साकारल्या.

पाठशाळेतील मुले : नेहा हापगुंडे, मानसी चौधरी,सानवी चौधरी, संजिवनी शिदे, प्रणव दिग्रसकर, आधिराज जालनेकर, भावेश तिलके

अध्यापक : आयुष केंद्रे

पठाणी सैनिक : राजेश कैरमकोंडा , गोपाल सायबी, हर्षवर्धन कळम, हरी कल्याणकर ऋषिकेश कल्याणकर,अरुण सांडगे

समूहांचा सहभाग

बौद्ध भिकूंचा समूह: आनंद कांबळे, शिरीष बडगावकर, युवराज कौसाडीकर, वल्लभ देशपांडे, समिहन गुरु

जैन मुनींचा समूह: प्रद्युम्न धुळसे, सौरव नळगे, नामदेव कुलकर्णी, वरद पाटील

सनातन पंडितांचा समूह: ऋषिकेश कराळे, सिद्धांत वेदपाठक, लक्ष्य चिंचमलातपुरे, आदित्य केंद्रे, पार्थ अत्करी, आयुष केंद्रे

पठाणी सैनिक: गिरीश रघौजीचार, राजेश गोपाल, कैरमकोंडा गोपाल, गणेश सायबी, हर्षवर्धन कळमपाटील, हरी ओम कल्याणकर, ऋषिकेश कल्याणकर, अरुण सांडगे

तांत्रिक बाजूला मजबूत साथ

नेपथ्य: भीमाशंकर निळेकर कुलकर्णी

प्रकाश योजना: चेतन धवले

पार्श्र्वसंगीत: भूषण भावसार

रंगभूषा व वेशभूषा: गजश्र्विनी देलमाडे

उद्घोषिका: कु. सुरभी हसूर

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे सुरु असलेली ही मराठी राज्य नाट्य स्पर्धा स्पर्धा अप्पर मुख्य सचिव श्री.विकास खारगे, संचालक विभीषण चवरे, सह-संचालक श्रीराम पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून या स्पर्धेसाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक म्हणून किरण चौधरी आणि त्यांची टीम परिश्रम घेत आहेत.

## अभिनेत्री अमृता देशमुख 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये झळकणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : अभिनेत्री अमृता देशमुख 'नियम व अटी लागू' या नाटकामुळे चर्चेत आहे. आता अमृता एका नवीन भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अभिनेत्रीने 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या सेटवरील शेअर केलेले फोटो सध्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहेत.अभिनेत्री अमृता देशमुखने सोशल मीडियावर महाराष्ट्राची हास्यजत्रामध्ये दिसणाऱ्या कलाकारांबरोबरचा फोटो शेअर केला आहे. अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकर आणि अभिनेता ओंकार राऊत यांच्याबरोबरचा हा फोटो आहे. यावर अभिनेत्रीने रियुनियन असे लिहिले आहे. याचबरोबर, अमृताने तिच्या स्टोरीमध्ये एक व्हिडीओ रिपोस्ट केला आहे, ज्यात ती फोटोंसाठी पोज देताना दिसत आहे. त्यानुसार ती 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये एन्ट्री घेणार असं म्हटलं जात आहे. अमृता देशमुख आता या सर्व कलाकारांबरोबर महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सज्ज झाली आहे.अमृता देशमुख, रसिका वेंगुर्लेकर व ओंकार राऊत या तिघांविषयी बोलायचे तर हे तिघे याआधी झी युवा वाहिनीवरील फ्रेशर्स या मालिकेत दिसले होते. २०१६ साली ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. या मालिकेत अमृताने परी देशमुख हे पात्र साकारले होते. रसिकाने रेणुका भिल्लारे तर ओंकार राऊतने धवल हे पात्र साकारले होते. याशिवाय या मालिकेत रश्मी अनपट, सिद्धार्थ खिरीड, मिताली मयेकर, शुंभकर तावडे हे कलाकार महत्वाच्या भूमिकेत दिसले होते. कॉलेजमधील तरूणाईवर आधारित ही मालिका होती. त्यांच्यातील मैत्री प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्याचे पाहायला मिळाले होते. आता २०१६ नंतर हे तीन कलाकार पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतली ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांची भेट

## विविध विषयांवर केली सकारात्मक चर्चा, खेडेकर परिवाराने खरात यांना भावी वाटचालीसाठी दिल्या शुभेच्छा

दैनिक आपला विदर्भ

**चिखली/प्रतिनिधी** : मेहकर मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ड. पुरुषोत्तम खेडेकर यांची भेट घेतली. ड. खेडेकर यांच्या चिखली निवासस्थानी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांना जिजाऊ-शिवरायांची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सत्कार खेडेकर परिवाराने केला.

यावेळी माजी आमदार रेखाताई खेडेकर, काँग्रेस नेते लक्ष्मणराव घुमरे, संभाजी ब्रिगेडच्या विचारांशी प्रामाणिक राहुन काम करणारे प्रदीप बिल्लोरे उपस्थित होते. यावेळी विविध सकारात्मक विषयांवर चर्चा करण्यात



आली. यावेळी जिजाऊ सृष्टीचा विकास, मातृतिर्थ सिंदखेडराजा, लोणार सरोवर, अजिंठा वेरुळ लेणी हे ग्लोबल टुरिझम सर्किट व्हावे या संदर्भातील ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या संकल्पना आमदार सिद्धार्थ खरात यांनी जाणून घेतल्या. आमदार सिद्धार्थ खरात हे गत अनेक वर्षांपासून जिजाऊ जयंतीदिनी खिचडीचे वाटप करतात.

मराठा सेवा संघासह अनेक पुरोगामी चळवळींशी त्यांची नाळ जुटलेली आहे. मिलिंद महाविद्यालयाचे ते विद्यार्थी असल्याने महापुरुषांचे विचार त्यांच्या रोमारोमात भिनले आहे. वारकरी चळवळीशी एकनिष्ठ राहून संतांचे समन्यायी विचार समाजात पोहोचविण्याचे काम ते सातत्याने करीत आले आहेत.

# एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल शाळांमध्ये प्रवेशासाठी २३ फेब्रुवारी, २०२५ रोजी प्रवेश परीक्षा

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : अनुसूचित व आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुल शाळांमध्ये प्रवेशासाठी २३ फेब्रुवारी,२०२५ रोजी आयोजित स्पर्धा परिक्षा प्रवेश परीक्षा होणार आहे. पात्र विद्यार्थ्यांकडून या परीक्षेचे अर्ज भरून मुख्याध्यापकांनी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे २५ जानेवारी, २०२५ पर्यंत सादर करावेत, असे छत्रपती संभाजीनगर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे यांनी कळविले आहे.

परीक्षेचे विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. अमरावती आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद आणि




कळमनुरी यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १२ जिल्ह्यांतील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व शासन मान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी ते आठवीमध्ये शिकत असलेल्या अनुसुचित, आदिम जमातीचे विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र राहतील, असे श्रीमती चेतना मोरे यांनी कळविले आहे.

## स्त्रीजीवनाच्या गुंतागुंतीवर भाष्य करणाऱ्या 'सेल्फी' नाटकाचे सादरीकरण

**नांदेड/प्रतिनिधी** : ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेत भारतीय स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे आणि स्वतःकडे अंतर्मुख होण्याचा संदेश देणारे सेल्फी हे दोन अंकी नाटक गोपाला फाऊंडेशन, परभणीच्या वतीने सोमवारी (ता.२) यशस्वीपणे सादरीकरण करण्यात आले. सुप्रसिद्ध लेखिका शिल्पा नवलकर यांच्या लेखणीतून साकारलेले हे नाटक स्त्रीच्या जीवनातील संघर्ष, तिच्या अंतर्मनातील घुसमट, आणि समाजाने लादलेल्या विविध बंधनांवर संवेदनशील भाष्य करते.

नाटकाचे शीर्षक सेल्फी आजच्या डिजिटल युगात स्वतःकडे नव्याने पाहण्याचा, स्वतःच्या अंतर्मनाशी संवाद साधण्याचा आग्रह करते. याच भावनेला केंद्रस्थानी ठेवून नाटकाच्या कथानकात पाच स्त्रियांचे प्रवास उलगडले आहेत. रेल्वे स्थानकाच्या वेटिंग रूममध्ये आपापल्या प्रवासाची वाट पाहणाऱ्या या पाचजणींमध्ये सुरू झालेला संवाद हळूहळू त्यांच्या आयुष्याच्या जटिल प्रवासाचा आरसा बनतो. वरवर सुखात आणि परिपूर्ण आयुष्य जगत असल्याचा आभास निर्माण करणाऱ्या या स्त्रिया, प्रत्यक्षात मात्र सामाजिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक पातळीवर संघर्ष करत आहेत.

नाटकातील मुख्य पात्रांमध्ये मध्यमवयीन स्वाती (कल्पना कुलकर्णी) ही एक गृहिणी आहे, जी सतत आपल्या परिपूर्ण संसाराचा डंका पिटवत असते, पण आतून मात्र ती स्वतःला हरवून बसलेली आहे. विभा (सुषमा कुलकर्णी), एक प्राध्यापिका, जी मूल नको असा ठाम निर्णय घेतल्याचे दाखवत असली तरी प्रत्यक्षात मूल होण्यासाठी व्याकुळ आहे. मिनाक्षी (कांती दैठणकर) ही उच्च पदावर असलेली अधिकारी आहे, जी लग्नाला नकार देत प्रेमाच्या शोधात भटकते, पण अपेक्षित जोडीदार न मिळाल्याने आत्महत्येचा प्रयत्न करते. तनुजा (पूनम श्रीरामवार) ही दोन वेळा विवाहबंधनात अडकूनही समाधान न मिळाल्यामुळे अस्वस्थ आहे. तर शाल्मली (सीमंतिनी कुंडीकर) ही टीव्ही अभिनेत्री आहे, जी गरोदरपणाची बातमी समजल्यानंतर आपले करिअर धोक्यात येईल या भीतीने अस्वस्थ आहे. या पाच स्त्रियांच्या संवादातून बाहेरून सुखी वाटणाऱ्या स्त्रियांचे अंतरंग हळूहळू प्रेक्षकांसमोर उलगडते. स्त्री म्हणून त्यांना येणाऱ्या अडचणी, सामाजिक दबाव आणि त्यांच्या स्वप्नांच्या उड्डाणावर येणाऱ्या मर्यादा यांचा वेध घेत नाटकाची कथा पुढे सरकते. त्यांच्या अंतर्मुख प्रवासात एकमेकांचे अनुभव आणि संवेदना उलगडताना, या स्त्रिया स्वतः ला नव्याने समजून घेतात. नाटकाचे दिग्दर्शन स्नेहल किशोर पुराणिक यांनी केले असून, प्रत्येक पात्राची अंतर्गत अवस्था प्रेक्षकांसमोर प्रभावीपणे उभी करण्यात त्यांनी यश मिळवले आहे.

# पिकस्पर्धा रब्बी हंगाम २०२४ साठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिकस्पर्धा रब्बी हंगाम २०२४ साठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

पिकस्पर्धा मागील वर्षाप्रमाणे तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येत आहेत. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

पीकस्पर्धेतील पीके : रब्बी पीके - ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस (एकूण ०५ पिके)

स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थींच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा अर्जासोबत सादर करावा.

रब्बी हंगामामध्ये ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर आहे. तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावरील पिकस्पर्धा निकाल - प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३००/- राहील व आदिवासी गटासाठी रक्कम रु.१५०/- राहील.

तालुका पातळी : पहिले बक्षिस पाच हजार रुपये, दुसरे बक्षिस तीन हजार रुपये, तिसरे बक्षिस दोन हजार रुपये.

जिल्हा पातळी : पहिले बक्षिस दहा हजार रुपये, दुसरे बक्षिस सात हजार रुपये, तिसरे बक्षिस पाच हजार रुपये

राज्य पातळी : पहिले बक्षिस ५० हजार रुपये, दुसरे बक्षिस ४० हजार रुपये, तिसरे बक्षिस ३० हजार रुपये

नमुद पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पिकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. पिकस्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी शेतकरी बंधुभगिनींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in ला भेट द्यावी.३

# शेगावात ऑपरेशन मुस्कान यशस्वी !

## ग्रामीण पोलिसांनी १३ वर्षीय बालकाला पालकांच्या दिले ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**शेगाव/प्रतिनिधी** : 'ऑपरेशन मुस्कान - १३ ' ही राज्यभरातील अल्पवयीन मुले आणि १८ वर्षांवरील महिलांचा शोध घेण्यासाठी राबविण्यात येत आहे. एक प्रभावी उपक्रम म्हणून दरवर्षी पोलीस विभागाकडून ही विशेष मोहिम राबवली जाते. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये शेगाव ग्रामीण पोलिसांनी पुण्यातील एका बालकाचा शेगाव परिसरात शोध लावून त्याच्या पालकांच्या ताब्यात देऊन 'ऑपरेशन मुस्कान - १३ ' यशस्वी केले आहे.

बुलडाणा पोलीस अधिक्षक विश्र्व पानसरे यांचे आदेशान्वये जिल्ह्यात ऑपरेशन मुस्कान-१३ हि शोध मोहीम दिनांक ०१ डिसेंबर ते दिनांक ३१ डिसेंबर या कालावधीत राबवणे करीता पोलीस स्टेशन स्तरावर पथक तयार करण्यात आले असून या मोहिमे अंतर्गत १८ वर्षाखालील हरवलेल्या बालकांचा व महिलांचा कसोशीने शोध घेवुन कार्यवाही करण्याबाबत आदेश शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रवीण लिंगाडे यांनी पो. उपनि, गजानन शिंदे, व तीन पोलीस अंमलदार एक महिला अंमलदार असे पोलीस स्टेशन स्तरावर पथक तयार केले आहे. सादर पथक हे शोध मोहीम दरम्याण पेट्रॉलीग करीत असतांना, ग्राम जवळा बसस्थानक येथे प्रसाद शशिकांत सांळुखे वय १३ वर्ष रा.



वालेकर हा रडत असतांना मिळून आला. त्यास विचारपुस केली असता त्याने सांगतले तो हा पुणे जिल्ह्यातील वाडी पिंप्री चिंचवड येथील राहणार असून आपण रागाचे भरात पुणे येथुन लक्झरी बसमध्ये शेगांव व तेथून जवळा येथे ऑटोने आलो आहे असे सांगितले.पथकाने त्यास शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला आणुन त्याचेकडुन त्याचे कुटुंबाची माहिती घेतली. त्यांनतर ठाणेदार प्रविण लिंगाडे यांनी सदर मुलाचे वडील शशिकांत नामदेव साळुंखे रा. पुणे यांचा मोबाईल क्रं. प्राप्त करुन त्यावर संपर्क करुन मुला विषयी माहिती देण्यात आली. त्यांनतर पालक शेगावात पोहचल्यावर त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. हि कारवाई पो.अ.सा.विश्र्व पानसरे, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी खामगांव, विनोद ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

महत्त्वाचे...

## बेकायदेशीर गुटख्यावर कल्याण पोलिसांची कारवाई; तिघांवर गुन्हा दाखल, एकाला अटक





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याणमध्ये पोलिसांनी एका गोदामावर छापा टाकत मोठ्या गुटखा रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. कल्याणचे डीसीपी अतुल झेंडे यांनी ही मोठी कारवाई केली आहे. या कारवाईमुळे गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत. या प्रकरणात तीन जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एकाला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

## घाटी रुग्णालयामध्ये हृदय बंद ठेवून केली हृदय शस्त्रक्रिया; १४ वर्षीय मुलाला मिळाले जीवनदान



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : आज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजी महाराज नगर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात एक हृदय शस्त्रक्रिया झाली. या हॉस्पिटलमध्ये १४ वर्षीय मुलाची ओपन हार्ट सर्जरी करण्यात आली. साडेचार तास ही शस्त्रक्रिया करून मुलाच्या हृदयातील छिद्र बंद करण्यात आले. रुग्णाला आता ऑपरेशन थिएटरमधून बाहेर काढण्यात आले असून त्याची तब्येत देखील चांगली असल्याची माहिती डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे शस्त्रक्रिया करण्यासाठी धडधडते हृदय बंद करून 'हार्ट लंग मशीन'च्या मदतीन शरीरात रक्त आणि ऑक्सिजन पुरवठा सुरळीत ठेवण्यात आला.

## अल्पवयीन विवाहितेची प्रसूती; मुलीचा पती, सासू आणि तिच्या आईवडिलांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** :अल्पवयीन मुलीची प्रसूती झाल्यानंतर वेदांतनगर पोलिसांनी कायद्याचा बडगा उगारला आहे. साडेपंधरा वर्षांच्या मुलीचा विवाह झाला त्यानंतर यावर्षी या मुलीची प्रसूती होऊन तिला मुलगा झाला. याप्रकरणी मुलीचा पती, सासू आणि मुलीच्या आईवडिलांविरुद्ध पोक्सो कायद्यानुसार बलात्कार आणि बालविवाह प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी वेदांतनगर पोलीस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, क्रांतीनगर भागातील एक अल्पवयीन मुलगी घाटी हॉस्पिटलमध्ये प्रसूतीसाठी दाखल झाली असून तिला मुलगा झाला असल्याची एमएलसी पोलीस ठाण्यात पाठविण्यात आली. १६ नोव्हेंबर रोजी ही एमएलसी पाठवण्यात आली होती. याप्रकरणी निरीक्षक यादव यांनी चौकशी केली. यामध्ये २६ वर्षांच्या मुलाचा विवाह देऊळगाव राजा रोड, जालना येथील एका दांपत्याच्या मुलीसोबत १७ डिसेंबर २०२३ ला झाल्याची माहिती मिळाली. यावेळी या मुलीचे वय १४ वर्षे ५ महिने होते. मुलगी अल्पवयीन असताना देखील तिचा विवाह लावण्यात आला. तसेच, पतीला देखील ती अल्पवयीन असल्याची माहिती असूनही त्याने शारीरिक संबंध ठेवल्यामुळे ती गर्भवती राहून तिची प्रसूती झाली. हा गुन्ह्याचा प्रकार असल्यामुळे निरीक्षक प्रवीणा यादव यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशानुसार महिला जमादार सुनीता राजू जाधव यांनी तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून आरोपी पती, सासू, मुलीचे आईवडील यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीएसआय संगीता गिरी याप्रकरणी तपास करीत आहेत अशी माहिती पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी दिली आहे.



# तालुक्यातील पहिले आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचा डोणगावला मान

## विविध मान्यवरांच्या उपस्थिती थाटात उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यातील कार्यान्वित झालेले आपले सरकार सेवा केंद्र म्हणून डोणगाव येथील अमोल ठाकरे यांचे सेवा केंद्र ओळखले जाते.गत १५ वर्षापासून जनतेस योग्य सेवा दिल्याचे बोलला जात आहे. त्याचे फळ म्हणून मेहकर तालुक्यातील पहिले आदर्श आपले सरकार सेवा केंद्र म्हणून त्यांची निवड झाली असून मेहकर उपविभागीय अधिकारी यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थित या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले आहे. डोणगाव येथील अमोल ठाकरे





हे आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून मागील १५ वर्षापासून परिसरातील नागरिकांना योग्य सेवा देत आहेत. या सेवाकार्याच्या व्रतामुळे अमोल ठाकरे यांच्या आपले सरकार सेवा केंद्राची आदर्श आपले सरकार सेवा केंद्र या उपक्रमासाठी मेहकर तालुक्यातून निवड करण्यात आली आहे. तर या आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचा शुभारंभ दि.४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता मेहकर उपविभागीय अधिकारी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी मा. कृषी व पशुसंवर्धन सभापती राजेन्द्र पळसकर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र आखाडे, काँग्रेसचे विनायकराव टाले, भाजपा महिला आघाडीच्या ज्योती बुरखंडे, तलाठी अनुप नरोटे, अमोल राठोड, चव्हाण, गुंठेवार, कोतवाल संतोष मानवतकर, संदीप परमाळे, नागेश मानवतकर, हमीद मुल्लाजी, जमीर पठाण, अभरार मिल्ली, सेतु संचालक विश्र्वास वाघ, गजानन बोंद्रे, प्रशांत कष्टे,मंडळ अधिकारी चनखोरे, गरीब ब्रिगेड संघटनेचे दिलीप गायकवाड,ज्येष्ठ समाजसेवक मुकुंदराव आखाडे, भाऊराव जावळे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला येणार्या मान्यवरांचे आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक अमोल ठाकरे, भारतीय स्टेट बँक ग्राहक सेवा केंद्राचे संचालक विवेक ठाकरे यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत करून सन्मान केला.

## विविध वृत्त...

### ध्वजदिन निधी संकलन समारंभ व माजी सैनिक मेळावा ७ डिसेंबरला

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीपत्नी,वीरमाता, वीरपिता यांच्यासाठी दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता सैनिकी कॉम्प्लेक्स, बस स्टॅंड समोर, बुलढाणा येथे ध्वजदिन निधी संकलन समारंभ तथा माजी सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या उपस्थितीत होणार असून सदर कार्यक्रमामध्ये जिल्हयातील वीपत्नी, वीरमाता, वीरपिता व विशेष गौरव पुरस्कारधारक या सर्वांचा सन्मान करण्यात येणार आहे.

जिल्हयातील सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीपत्नी,वीरमाता, वीरपिता व अवलंबित आणि जास्तीत जास्त माजी सैनिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन स्कॉड्रन लिडर रुपाली पांडुरंग सरोदे (नि.) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बुलढाणा यांनी केले आहे.

### जिल्हा परिषदेची अनुकंपाधारक उमेदवारांची जेष्ठता यादी प्रसिध्द; शैक्षणिक कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत सन २०२४ ची अनुकंपाधारका उमेदवारांची तात्पुरती सुधारीत जेष्ठता यादी ु.र्लिश्रवरपर.ारहरीरीहीीर. सीं.ळप या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेले होती. सदर अनुकंपाधारक उमेदवारांच्या तात्पुरत्या जेष्ठता यादीवर संबंधीताकडून लेखी आक्षेप मागविण्यात येऊन प्राप्त अपक्षेपाची पडताळणी करुन अंतिम जेष्ठता यादी तयार करण्यात आली आहे. सदर अंतिम जेष्ठता यादीवर जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. या यादीमधील अनुकंपाधारक उमेदवार यांचे शैक्षणिक कागदपत्र व इतर आवश्यक कागदपत्र ही यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसापर्यंत सदर करावी, असे आवाहन जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

### संजय गांधी निराधार योजनेचे अर्थसहाय्य डीबीटीव्दारे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार; आधार लिंक करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महसुल विभागाच्या संजय गांधी शाखेमार्फत लाभ देण्यात येणाऱ्या योजनांची अर्थसहाय्य ऑक्टोबर महिन्यापासून डीबीटी प्रणालीव्दारे करण्यात येणार आहे. श्रावणबाळ, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी विधवा, दिव्यांग, वृध्दापकाळ योजनेच्या लाभार्थ्यांनी डीबीटी प्रणालीव्दारे अर्थसहाय्य प्राप्त करुन घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

अर्थसहाय्य प्राप्त करुन घेण्यासाठी लाभार्थ्यांनी त्यांचे आधारकार्ड व बँक पासबुक संजय गांधी शाखा तहसील कार्यालय किंवा संबंधित गावाचे तलाठी अथवा कोतवाल यांच्याकडे जमा करावे. यापूर्वी जमा केले असल्यास परत जमा करण्याची आवश्यकता नाही.

लाभार्थी यांनी आधार सेवा केंद्राव्दारे आपले आधार अद्यावत असल्याची खात्री करावी. आधार अद्यावत नसल्यास ते अद्यावत करुन घ्यावे. लाभार्थी यांना डीबीटी प्रणालीव्दारे अर्थसहाय्य प्राप्त करण्यासाठी लाभार्थी यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे. लाभार्थी यांनी बँक शाखेत जाऊन अथवा http://resident.uidai.gov.in/bank-mapper या वेबसाईटवर तपासून (आधार सिडिंग) झालेले असल्याची खात्री करावी. बँक खाते आधार संलग्न नसल्यास आधार सिडींग चा फॉर्म बँकेत भरुन द्यावा.

### लातूर जिल्ह्यातील १४० शाळांमध्ये 'परख' सर्वेक्षण

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत ४ डिसेंबर २०२४ रोजी देशभरात एकाच दिवशी इयत्ता तिसरी, सहावी व नववी या वर्गाच्या यादृच्छिकपणे निवडलेल्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळामध्ये परख सर्वेक्षण घेण्यात आले.लातूर जिल्ह्यातील १४० शाळांमध्ये हे सर्वे क्षण आयोजित करण्यात आले होते.

या सर्वेक्षणात १८४ अन्वेषक म्हणून डी.एल.एड विद्यालयातील छात्राध्यापक, अध्यापक व तालुका साधन व्यक्ती, विशेष तज्ञ यांनी काम पाहिले. तसेच निरीक्षक म्हणून सीबीएसई शाळेतील १३१ शिक्षकांनी काम पाहिले. जिल्ह्यामधील ३ हजार ३६८ विद्यार्थ्यांचे सर्वे क्षण करण्यात आले. तसचे ४०५ शिक्षकांचे प्रश्नावलीच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात आले. 'परख' सर्वेक्षणात डीएलसी जिल्हास्तर समन्वयक म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी काम पाहिले. तसेच समन्वयेक म्हणून डॉ. जयपाल कांबळे, डॉ. जगन्नाथ कापसे, श्रीमती गंगा मेनकुदळे, घनश्याम पौळ, संतोष ठाकूर, डॉ. राजेश गोरे, डॉ. योगेश्र्वरी नाडे, निशिकांत मिरकले, गिरीश माने यांनी काम पाहिले. सर्वांच्या समन्वयाने परख सर्वेक्षण २०२४ यशस्वीरित्या पार पाडले. जिल्ह्यातील ४४ शाळांतील इयत्ता तिसरीचे १ हजार ५५ विद्यार्थी तर ८८ शिक्षक तसेच ४६ शाळांतील इयत्ता सहावीचे ९५६ विद्यार्थी व १२५ शिक्षक आणि इयत्ता नववीमधील ५० शाळांतील १ हजार ३५७ विद्यार्थी व १९२ शिक्षक असे एकूण १४० शाळांतील ३ हजार ३६८ विद्यार्थी व ४०५ शिक्षक यांनी'परख' सर्वेक्षणात सहभाग घेतला, असे मुरुड येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी यांनी कळविले आहे.

# व्यवसाय प्रमाणपत्र देण्यासाठी लातूर शहरात सर्वेक्षण सुरू

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये लातूर शहर महापालिका क्षेत्रात व्यावसाय करणा–या व्यापा–यांकडे व्यवसाय परवाना प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने मा. सर्वसाधारण सभा दि. १३/१०/२०१७ विषय क्रं. ०८ ठराव क्रं. २५ व मा. स्थायी समिती सभा दि. २४/१०/२०१८ विषय क्रं. ०४ ठराव क्रं. ६३ व मा. आयुक्त महोदय यांनी गठीत केलेली समितीने दि. १४/०२/२०२३ रोजी बैठकीमध्ये दर निश्र्चिती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने व्यावसाय प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शहरात सर्वेक्षण सुरू करण्यात येत आहे. शहरात मोठ्या प्रमाणामध्ये लहान–मोठे व्यावसायीक आहेत. परंतू अनेक व्यावसायीक महापालिकेच्या व्यवसाय परवान्यायविनाच आपला व्यवसाय करत आहेत. परिणामी महापालिकेचे उत्पन्न / महसूल मिळत नाही. महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला असल्यामुळे त्याचा परिणाम विविध विकास कामे राबविताना दिसून येतो.

त्याअनुषंगाने लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरात व्यतवसायीकांचे सर्वेक्षण करण्यासाठी अमरावती येथील सिमॅक आय.टी.प्रा.लि. या संस्थेला काम देण्यात आले आहे. या संस्थेमार्फत शहरातील सर्व छोटे – मोठे व्यवसायीकांना परवाना प्रमाणपत्र देण्यासाठी संपूर्ण प्रक्रिया राबविण्यासाठी सर्व्हेक्षण सुरू करण्यात येत आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्या नंतर मुख्य कार्यालयासह क्षेत्रिय कार्यालयातून शुल्क आकारून व्यवसाय प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# भीषण अपघात ॲम्बुलन्स चालक ठार

## बिबी येथे दुसरबीड रोडवरील घटना : ॲम्बुलन्स व ट्रकचा झाला अपघात

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : भरधाव वेगाने जात असलेल्या ट्रक व म्बुलन्सचा भीषण अपघात झाल्याने म्बुलन्स चालक ठार झाला. ही घटना बिबी ते दुसरबीड रोडवरील पेट्रोल पंपाच्या बाजुला दि.३ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता दरम्यान घडली. या अपघातात म्बुलन्स चालक अक्षय उकंडा आडे रा.आईचा तांडा किनगाव जट्टू ता. लोणार जि.बुलढाणा हा जागीच ठार झाला.तर वाहक गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारार्थ जालना हलविण्यात आले.



घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार बिबी येथून दुसरबीडकडे म्बुलन्स जात असातना विरुद्ध दिशने भरधाव वेगाने येणार्या ट्रकची समोरासमोर भीषण धडक झाली. हा अपघात बिबी ते दुसरबीड रोडवरील पेट्रोल पंपाच्या बाजुला घडला. या भीषण अपघातात म्बुलन्स चालक अक्षय उकंडा आडे रा.(आईचा तांडा) किनगाव जट्टू ता.लोणार जि. बुलढाणा हा जागीच ठार झाला. तर म्बुलन्स वाहक राजेश्र्वर वाकळे वय वर्ष ३० रा. वाशी मुंबई हा गंभीर जखमी झाला. या अपघाताची माहिती मिळताच परिसरातील सर्व नागरिक बिबी ग्रामीण रुग्णालयाचे १०८ चे कर्मचारी डॉ. देवानंद फड यांनी माहिती दिली.

त्यांनी तात्काळ ॲम्बुलन्स चालक राठोड यांनी दिली. म्बुलन्स चालक राठोड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमींना मदत दिली.

त्यानंतर जखमी वाकळे यांना पुढील उपचारासाठी जालना येथे पाठविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच बिबी पोलिस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील व त्यांचे सर्व कर्मचारी घटनास्थळी हजर झाले व त्यांनी वाहतूक सुरळीत केली.या भीषण अपघातात ट्रक व म्बुलन्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या घटनेबाबत पुढील तपासणी बिबी पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२४–२५ साठी ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील निकषानुसार पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ दिला जातो. सन २०२४–२५ या वर्षापासून नव्याने कार्यरत होत असलेले ऑनलाईन पोर्टल हे शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी एकत्रित तयार केले असल्याने शासकीय वसतिगृहास ऑनलाईन अर्ज करणाऱ्या ज्या पात्र अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेअभावी निवड शासकीय वसतिगृहात झालेली नाही, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्रणालीव्दारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ग्राह्य धरले जाऊन नियमानुसार पुढील पडताळणीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

शैक्षणिक सत्र २०२४–२५ साठी शासकीय वसतिगृह प्रवेश व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना http://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आलेले असून याबाबतचे अर्ज ऑनलाईन पोर्टलव्दारे स्वीकारण्यात येत आहेत.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलव्दारे दिलेल्या मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत आणि या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीव्दारे आपोआप स्वाधार योजनेसाठी वर्ग होणार आहेत अशा विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेसाठी नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

विद्यार्थ्यांचे उशिरा सुरु होणारे शैक्षणिक सत्र, सद्यस्थितीत स्वाधार योजनेच्या लाभ घेत असलेले विद्यार्थी तसेच नव्याने स्वाधार योजनेसाठी अर्ज करणारे विद्यार्थी यांना ऑनलाईन अर्ज करतांना तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांनी मुदतवाढ देण्याबाबत मागणी केली आहे. त्यामुळे अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दि.१६ डिसेंबर २०२४ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

त्यामुळे बुलढाणा शहरात इयत्ता दहावी नंतरचे शिक्षण घेत असलेल्या केवळ अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनीच http://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

# गोवर्धन नगर येथे घराला भीषण आग; सोयाबीन जळून खाक, शेतकऱ्याचे लाखोचे नुकसान

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गोवर्धननगर येथे घराला आग लागून शेतकर्यांचे लाखो रुपयांचे सोयाबीन जळून खाक झाले.ही घटना दि.४ डिसेंबर रोजी रात्री ७ वाजता दरम्यान घडली. या घटनेत शेतकरी किसन दासू चव्हाण वय ७५ रा. गोवर्धन नगर यांचे ६० हजार रुपये किंमतीचे १५ क्विंटल सोयाबीन,गहू,तुरीची डाळ, उडदाची डाळ, मुगाची डाळ नगदी रोक रक्कम ७० हजार रुपये यासह घरगुती साहित्य व त्यांच्या घराला लागूनच असलेले रघुनाथ दासू चव्हाण यांच्या घरातील साहित्य सुद्धा जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या आपत्तीने हे शेतकरी कुटुंब उघड्यावर आले आहे. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार बिबी



पोलीस स्टेशनतर्गत येत असलेल्या गोवर्धन नगर येथील शेतकरी किसन दासू चव्हाण यांच्या घराला अचानक आग लागली.या आगीत त्यांच्या घरातील १५ क्विंटल सोयाबीन, गहू, तूर डाळ, उडीद डाळ,मूग डाळ, यासह रोख रक्कम ७० हजार व इतर साहित्य असे साहित्य जळून लाखो रुपयांचे नुकसान झाले. तसेच त्यांच्या घराला लागूनच असलेले त्यांचे भाऊ रघुनाथ दासू चव्हाण यांच्या सुद्धा घरातील साहित्य जळून खाक झाले आहे. घराला आग लागल्याची माहिती होताच गावकऱ्यांनी आग आटोक्यात आणण्यात आणण्याचा प्रयत्न केला. आग आटोक्यात आणण्यासाठी लोणार येथून अग्निशमन



दलाच्या गाडीला पाचारण करण्यात आले होते. अग्निशमन दलाच्या गाडीने पाण्याचे फवारे मारून आग आटोक्यात आणण्यात आणली. या घटनेचा पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाच्या वतीने पंचनामा करून वरिष्ठाकडे पाठविण्यात आला आहे.घटनेचा पुढील तपास बिबी पोलीस स्टेशनचे कर्मचारी करीत आहेत.